# मध्ययुगाकडे वाटचाल : भाग दोन

**चंद्रशेखर पुरंदरे**

जूनच्या पहिल्या दहा दिवसांत इराकचा सध्याचा नकाशा कायमचा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. Islamic State in Iraq and Syria (किंवा Levant) - ISIS - या कट्टर इस्लामी संघटनेमुळे ही परिस्थिती आली आहे. या संघटनेला नावाप्रमाणे सीरिया व इराक हे शेजारचे देश एकत्र करायचे आहेत. या देशांच्या कृत्रिम सीमा त्यावेळचे वसाहतवादी देश - ब्रिटन व फ्रान्स - यांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी निर्माण केल्या. ISIS ला त्या रद्द करायच्या आहेत व एक जहाल इस्लामी खिलाफत तेथे स्थापन करायची आहे. ही संघटना मुस्लिमातील सुन्नी पंथीयांची आहे. शिया, अहमदिया वगैरे मुस्लिमांचे इतर पंथ त्यांना मंजूर नाहीत. ते धर्मद्रोही आहेत असा ISIS चा दावा आहे. त्याबरोबरच मुस्लिमेतर लोकांना या खिलाफतीत धर्मांतर केल्याखेरीज जगण्याचा अधिकार नाही. त्यांना ठार मारणे हे धर्मकर्तव्य आहे. ISIS ने या ध्येयासाठी सीरिया व आता इराकमध्ये कमालीची हिंसक वाटचाल चालू केली आहे. लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत उत्तर इराकचा बहुसंख्य भूभाग बळकावून त्यांची मार्गक्रमणा बगदाद या राजधानीकडे चालू आहे. ते बगदादपासून ५०-६० किलोमीटर्सवर पोचले आहेत.

**पार्श्वभूमी**

ISIS च्या उदयाची पार्श्वभूमी सीरिया व इराक या सध्याच्या संबंधित देशांत पाहणे उचित ठरेल. अरब वसंतादरम्यान सीरियात बशर असद या हुकूमशहाच्या विरोधात तीन वर्षांपूर्वी लोकशाहीच्या मागणीची आंदोलने सुरू झाली. असदने ती बंदुकीच्या जोरावर दडपल्यावर सशस्त्र निषेध सुरू झाले. हा विरोध प्रामुख्याने सीरियन लष्करातून फुटून बाहेर पडलेल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली होता. त्यांना मोठ्या प्रमाणावर तुर्कस्तान व पाश्चात्त्य राष्ट्रांकडून आर्थिक व लष्करी मदतीची अपेक्षा होती. ती फोल ठरली. त्यामुळे असदच्या सरकारी फौजा व हे विरोधक यांच्या रस्सीखेचीला अनिर्णायक अवस्था आली. असदच्या सैन्याला हेजबोल्ला या पॅलेस्टिनी सशस्त्र संघटनेमार्फत इराणचीही मदत होती. बऱ्याचशा भूभागावर ना असदची सत्ता, ना विरोधकांची अशी सत्तेची पोकळी निर्माण झाली व आधी अल्-कईदा ही बिन लादेनची मुस्लिम आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना व आता ISIS यांनी जोम धरला. म्हणजे असदला असणारा आधीचा विरोध हुकूमशाही विरुद्ध होता तर ISIS चा विरोध धर्मसहिष्णुतेला आहे.

मध्यपूर्वेत हा विरोधाभास बऱ्याच ठिकाणी आढळतो. हुकूमशहा धर्मसहिष्णु असतात तर नंतर जेथे लोकशाही राजवटी आल्या त्या कडव्या व विशिष्ट धार्मिक पंथाचा पुरस्कार करणाऱ्या आल्या. सद्दाम हुसेन सुन्नी मुस्लिम होता. त्याने सत्ताकेंद्रात सुन्नी मुस्लिमांचा भरणा केला व शियापंथीयांना बाजूला ठेवले पण शिया-सुन्नी संबंध अगदी गुण्यागोविंदाचे नाहीत तरी बऱ्यापैकी एकमेकांना सामावून घेणारे राहिले. तीच परिस्थिती होस्ने मुबारक या इजिप्शियन हुकूमशहाच्या राजवटीत आढळली. दोन्ही हुकूमशहांनंतर दोन्हीकडे निर्वाचित लोकशाही सरकारे आली. इजिप्तमध्ये लगेचच ख्रिश्चनांसारख्या अल्पसंख्यांकांचा छळ सुरू झाला. इराकमध्ये नूर मलिकी या शिया पंतप्रधानाचे सरकार येताच सुन्नी मुस्लिमांचा व्यवस्थात्मक छळ सुरू झाला. त्यामुळे येथे 'उजवे', 'उदारमतवादी' या पाश्चात्त्य ज्ञानावर आधारित समाजशास्त्रीय संज्ञा गैरलागू ठरतात.

सद्दाम हुसेनचा पाडाव अमेरिकन आक्रमणाने झाल्यानंतर तीन निर्वाचित सरकारे इराकमध्ये आली. प्रत्येकवेळी नूरी मलिकी पंतप्रधान झाला. (तिसऱ्या निवडणुका मे मध्ये झाल्या व सरकार येत्या काही महिन्यात पुरेशा सौदेबाजीनंतर स्थापन होईल पण मलिकीच पंतप्रधान होईल अशी चिन्हे ISIS च्या आक्रमणापर्यंत तरी आहेत.) सीरियावरील मागील एका लेखात लोकशाहीच्या मागणीपेक्षा (जी अरब वसंतात प्रमुख होती) शिया-सुन्नी वैर सीरियात यादवीला कारणीभूत असल्याचे म्हटले होते. इराकमध्ये ती परिस्थिती दिसत नाही. दुसऱ्या शब्दांत, अमेरिका-ब्रिटनच्या आक्रमणापेक्षा सद्दामनंतरची नूरी मलिकीची राजवट हे वैर जन्माला आणण्यास व जोपासण्यास जबाबदार दिसते. या व्यवस्थेत आपल्याला कधीही न्याय मिळणार नाही या भावनेने अनेक तरुण सुन्नी ISIS मध्ये दाखल झाले.

ISIS चा पैशाचा एक स्रोत दहशतीतून आलेला दिसतो. ट्रक ड्रायव्हर्सकडून, दुकानदारांकडून, उद्योगधंद्यांतून पैसा गोळा करणे, पाश्चात्त्य नागरिक ओलीस ठेवून त्या सरकारांकडून प्रचंड खंडणी वसूल करणे, बँकांवर दरोडे घालून रोख पळवणे इत्यादी. त्याबरोबरच शिया मुस्लिमांविरुद्ध लढण्यासाठी मध्यपूर्वेतील संपन्न सुन्नी राजवटींनी म्हणजे सौदी अरेबिया, कटार यांनी त्यांना प्रचंड मदत केलेली आहे. जेथे सरकारी सैन्याचा पराभव केला, तेथे त्यांचे गणवेश, शस्त्रास्त्रे (मुख्यत: अमेरिकन) ISIS ने हस्तगत

केली. ISIS चा ध्येयवाद म्हणजे शरिया कायद्यानुसार कडक अंमलाखाली समाजरचना. त्यानुसार स्त्रियांची भूमिका घरात पडदानशीन राहणे व प्रजोत्पादन करणे. त्यांना शिक्षण, नोकऱ्या, त्यांचा बृहत्‌समाजात वावर ISIS ला मान्य नाही. धूम्रपान-मद्यपान यावरील (सद्‌गुणी!) बंदीबरोबरच संगीत-टिव्ही-सिनेमे या कला, माध्यमे यांवरही बंदी असेल. शरिया तरतुदींनुसार गुन्हेगारांना हातपाय तोडणे, दगडांनी ठेचून ठार मारणे वगैरे न्यायदान केले जाईल इत्यादी. या जाचक धोरणांना आधुनिक जगाची ओळख असणाऱ्या तरुण-पिढीचा अर्थातच विरोध आहे. पण तो विरोध हिंसेच्या भीतीने दाबण्यात येतो.

इराकमध्ये उत्तरेकडे कुर्द लोकांची वस्ती आहे. कुर्द हे भिन्न वंशाचे लोक आहेत. ते अरब नाहीत. मुस्लिम असले तरी त्यांचे अरबांशी संबंध वैराचेच राहिलेले आहेत. उरलेला इराक अरब आहे. कुर्द उत्तर इराकशी भौगोलिक सान्निध्य असणाऱ्या इराण व सीरियातही आहेत. त्यांना त्यांचे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र देण्यात येईल असे आश्वासन इराक व सिरियाच्या स्वातंत्र्याच्या वेळी वसाहतवादी शक्तींनी दिले होते. ते पाळले गेले नाही. तेव्हापासून या प्रत्येक देशात कुर्द नाराजीने व नाइलाजाने राहिलेले आहेत. पहिल्या इराक-अमेरिका (१९९१) युद्धात अमेरिकेने कुर्द लोकांचा प्रदेश इराकच्या केंद्रीय अखत्यारीतून हटवला. तेव्हापासून तो प्रदेश स्वायत्त झाला. या प्रदेशात तेलाचे साठे प्रचंड असल्याने अमेरिकेला त्याचा फायदा झाला व कुर्द लोकांचीही इराकच्या जोखडातून सुटका झाली. आता त्यांचे स्वत:चे सैन्यही आहे. ISIS ला कुर्दही अमान्य आहेत.

**सद्यस्थिती**

जूनच्या पहिल्या आठवड्यात ISIS चे सुमारे हजार सैनिक इराकमध्ये आले. त्यांनी इराकमधील दुसरे महत्त्वाचे शहर - मोसूल - लगेच ताब्यात घेतले. हेही शहर उत्तरेकडचे आहे व कुर्दिश प्रांताजवळचे आहे. तेलाच्या साठ्यांच्या व प्रक्रियेच्या कारखान्यांच्या दृष्टीने हे शहर मोक्याचे आहे. त्याचा पाडाव हा इराकच्या केंद्र सरकारला व उर्वरित जगालाही मोठाच धक्का होता. मोसूल अगदी सहजरीत्या ISIS च्या ताब्यात आले. त्यांची हिंसक कीर्ती माहीत असल्याने व देशासाठी लढण्याचे मनोधैर्य नसल्याने या शहराच्या संरक्षणासाठी असणारे प्रचंड इराकी सैन्य या हजारभर आक्रमकांपुढे पूर्णपणे शरण गेले. ISIS च्या हाती लागल्यास हालहाल करून ठार मारण्यात येणार या भीतीने आपले गणवेश रस्त्यातच बदलून साध्या वेशात सैन्य पसार झाले. त्यांनी त्यांची शस्त्रास्त्रेही तेथेच सोडली. जे कोणी ISIS च्या ताब्यात सापडले त्यांच्या कत्तली ISIS ने इंटरनेटवर दाखवल्या. सध्या वर्ल्ड कप फूटबॉल चालू आहे. एका सैनिकाचे तोडलेले मुंडके 'हा आमचा मानवी कातडीचा फुटबॉल' म्हणूनही दाखवला. त्यांच्या भीतीने सुमारे ५ लक्ष नागरिक शहर सोडून गेले. जाणाऱ्या वाहनांवर ISIS ची नजर असल्याने लोकांनी पायीच शहर सोडले. यावरून मानवी वेदनेच्या प्रमाणाची व तीव्रतेची कल्पना यावी. मात्र ISIS ने शहरभर घोषणा करून 'सामान्य नागरिकांना आमच्यापासून धोका नाही' असे जाहीर केले. मोसूल ताब्यात येणे हे ISIS च्या दृष्टीने फारच फायद्याचे ठरले आहे. तेथील बँकांमधील कोट्यवधीचे चलन त्यांना रोख मिळाले. इराकी सैन्याला अमेरिकेने पुरवलेली शस्त्रास्त्रेही मिळाली आहेत. त्यामुळे आणखी काही महिन्यांची ISIS ची बेगमी झाली आहे. मोसूलनंतर अल् फतर हे छोटे शहर व इतरही गावे बळकावून ISIS आता बगदाद काबीज करण्यामागे आहे. तेथे पकडलेल्या इराकी सैनिकांना मोसूलमध्ये सार्वजनिकरीत्या ठार मारण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण गावभर अक्षरश: दवंडी पिटवून नागरिकांना देण्यात आले आहे. त्यायोगे दहशत कायम राहील.

दरम्यान ISIS च्या आक्रमणाने सीरिया-इराण व इराकमधील कुर्द लोकांचे स्वतंत्र राष्ट्र स्थापण्याचे स्वप्न साकार होईल अशी त्यांना आशा वाटत आहे. इराकची मध्यवर्ती सत्ता कमकुवत होणे कुर्द लोकांना हवेच आहे. कारण कुर्द विरुद्ध सुन्नी व शिया इराकी अरब व इराक अंतर्गत सुन्नी अरब विरुद्ध शिया अरब असे या वैराचे पैलू आहेत. ISIS चा रोख आता बगदादबरोबरच समरा या शिया मुस्लिमांच्या तीर्थस्थानावर आहे. तेथे काही काळापूर्वी झालेल्या घातपातामुळे इराकभर शिया-सुन्नी दंगली उसळल्या होत्या. समरा हे जगभराच्या शियांचे पवित्र स्थान असून तेथे दरवर्षी यात्राही भरते. त्यासाठी मोठ्या संख्येने इराणी भाविक शिया मुस्लिमही जातात. समरावर ISIS आक्रमण करणार हे लक्षात येताच इराणही या संघर्षात आता सामील झाला आहे. मुळात सीरियातील असद राजवट व नूर मलिकीची राजवट या शिया असल्याने इराण त्यांना सहानुभूत आहेच. या दहशतवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी इराणचे सैन्य अधिकृतरीत्या आले नसले तरी अनधिकृतरीत्या इराकी सरकारच्या बाजूने कार्यरत आहे. त्यांच्या अशा सुन्नीद्वेषी पोलीस संघटनेचा प्रमुख बगदादमध्ये तळ ठोकून आहे. तो इराकी सरकारला व्यूहरचनेचा सल्ला देत आहे. त्याखेरीज काही हजार इराणी स्वयंसेवक समराच्या रक्षणासाठी बलिदान करायला तयार आहेत. तेही इराकला जाऊ इच्छितात.

इराकच्या शियांचा सर्वोच्च धर्मगुरू सिस्तानी याने इराकी जनतेला आवाहन केले आहे. त्यानुसार प्रत्येक सक्षम नागरिकाने शस्त्रे हाती घेऊन ISIS चा सामना करावा. सिस्तानीच्या शब्दाला विशेषत: इराकी-शियांमध्ये वजन आहे. म्हणजे दोन गोष्टी स्पष्ट होतात. एकतर देशाच्या लष्करावर कोणाचाच विश्वास नाही. ना सरकारचा, ना धार्मिक नेत्यांचा, ना सामान्य जनतेचा. दुसरी गोष्ट म्हणजे हे यादवीला अधिकृत आमंत्रण आहे. कारण हा सशस्त्र

लढा ISIS विरोधापुरता मर्यादित न राहता प्रत्येक सुन्नीच्या विरोधात जाण्याची शक्यता दाट आहे.

सामान्य जनतेला स्वत:च्या देशाच्या लष्कराविषयी अतोनात घृणा आहे कारण लष्कराची हडेलहप्पी, लूटमार, निरपराध नागरिकांना बेकायदेशीर अटक व हत्या, स्त्रियांवर अत्याचार असा इराकी लष्कराचा इतिहास आहे. त्यामुळे ISIS च्या प्रभावाखालील प्रदेश परत मिळवण्यासाठी सरकारने लष्कर धाडण्याची लोकांना भीती वाटते. ते आगीतून फुफाट्यात पडणे आहे. आतंकवादी असल्याच्या वहीमाने अनेक कत्तली लष्कराने केलेल्या आहेत. त्यामुळे एकवेळ ISIS परवडले पण लष्कर नको अशी सार्वत्रिक भावना आहे.

**बाहेरचे लागेबांधे**

इराणच्या हस्तक्षेपाचा वर उल्लेख केलाच आहे. इराकमधल्या तेलाच्या सर्वात मोठ्या प्रक्रिया कारखान्यावर ISIS ने १७ जूनला हल्ला केला. तेथून सर्व कर्मचारी हलवण्यात आले असे सरकार म्हणते. या अस्थिरतेमुळे जगभर तेलाचे भाव भडकले. भारतीय शेअर बाजारही काही तासांच्या अवधीत ३०० ने खाली घसरला. तेलाच्या निर्यातीवर परिणाम होणार हे लक्षात येताच अमेरिकेनेही लष्करी सल्लागार इराकला परत पाठवायला सुरुवात केली आहे. इराकची मागणी शस्त्रास्त्रे, हेलिकॉप्टर्स अशीही आहे. पण त्या मदतीसाठी नूरी मलिकीने सत्ता सोडावी ही पूर्वअट घालण्याची अमेरिकेच्या काही खासदारांची मागणी आहे. विशेष म्हणजे एकेकाळी शत्रू असणारे व आठ-नऊ वर्षे एकमेकांशी युद्ध लढणारे इराण व इराक एकत्र येताना दिसत आहेत. त्याबरोबरच एकमेकांना पाण्यात पाहणारे अमेरिका-इराण या निमित्ताने ISIS च्या विरोधात उभे राहताना दिसतात. त्यामागे दुसरी एक भीती आहे. उद्या जर ISIS ची खिलाफत होऊन सीरिया-इराक विसर्जित होऊन एकत्र आलेच तर ही सुन्नी खिलाफत शिया इराणच्या सीमेवर भिडेल. दोन्ही धर्मपंथीय सारखेच कडवे व स्वत:ला श्रेष्ठ मानत असल्याने संघर्षाची शक्यता कायम राहणार. तसेच ISIS च्या सैन्यात काहीशे तरी पाश्चात्त्य गोरे मुसलमान जिहादसाठी तेथे गेलेले आहेत. ही मंडळी पुढेमागे मायदेशी परतली की ही त्या-त्या देशात व्यवस्थेविरुद्ध हिंसक कारवाया सुरू करणार ही पश्चिमेची भीती आहे.

इराकची ISIS विरुद्धची आघाडी लष्कराच्या नियमित सैन्यावर कमी आणि उत्साही, धर्मभावनेने प्रेरित झालेल्या स्वदेशी व इराणी स्वयंसेवकांवर जास्त आहे. या मंडळींना ना लष्करी प्रशिक्षण ना अनुभव. त्यामुळे ते ISIS च्या व्यावसायिक लष्करापुढे हकनाक बळी जाण्याची शक्यता आहे. इराक-इराण युद्धामध्ये इराणने ८-९ वर्षांच्या लहान मुलांचे सैन्य करून त्यांचे असेच शेकड्याने बळी दिले होते. अशा विकृत, धार्मिक व व्यर्थ हौतात्म्याची ही पुनरावृत्ती दिसते. कुर्द लोकांच्या सैन्यालाही ISIS विरुद्ध लढण्यासाठी मलिकीने साकडे घातले आहे. त्याबरोबरच अमेरिकेलाही. विशेषत: तेलाच्या साठ्यांवर व निर्यातीवर कुर्द प्रांताची अर्थव्यवस्था अवलंबून असण्याने ते सैन्य या लढ्यात उतरत आहे.

**निष्कर्ष**

ISIS केवळ माथेफिरू, धर्मवेड्या मुस्लिमांची संघटना आहे हे पश्चिमेचे या प्रश्नाचे सुलभीकरण दिसते. वर म्हटल्याप्रमाणे त्यामागे स्थानिक हुकूमशहा, अलिकडचे इराकवरील पश्चिमेचे आक्रमण, कुर्द लोकांना स्वत:चे राष्ट्र हवे असण्याची महत्त्वाकांक्षा, इराणची त्याच्या शिया इस्लामच्या वसाहतवादाची इच्छा, सद्दामचे छुपे सुन्नी समर्थक व तेल असे अनेक घटक आहेत. या गुंत्यात सामान्य माणूस कोणाच्याच खिजगणतीत नाही हे सांगणे न लगे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*